# आजीवन अध्ययन व विस्तार विभाग
## उपक्रमाचा वार्षिक अहवाल
## सत्र २०१९– २०२०

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार विभागाअंतर्गत श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा. येथे हा विभाग मागिल ८ वर्षापासून कार्यरत आहे. सत्र २०१९– २०२० मध्ये आजीवन अध्ययन व विस्तार विभागात 'उन्नती व संस्कार प्रकल्प' मध्ये एकूण ३० विद्यार्थीनीचा सहयोग व सक्षम प्रकल्पाअंतर्गत सहभाग असून 'उन्नती व संस्कार प्रकल्पांअंर्तत १७ विद्यार्थीनींनी माहिती संकलनासाठी ०२ व्यक्ती अध्ययन अहवाल केंद्र/राज्याच्या व्यक्तीगत लाभांच्या योजनांवर अध्ययन केले व यात त्यांनी आपले निष्कर्श व त्या व्यक्तीचा अहवाल वहित नमूद केला, तो अहवाल राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रंथ संपदेवर आधारीत लेख लिहले.

संकलीत उन्नती व संस्कार वहिचे मुल्यांकन केल्यानंतर त्यांचे गुण तालिका प्रवेशीत विद्यार्थीनीचे परीक्षा क्रमाक आल्या नंतर एक प्रत आजिवन अध्ययन व विस्तार विभागाला आणि एक प्रत विद्यापीठ परीक्षा नियंत्रकाच्या कक्षात पाठविण्यात आले.

'उन्नती प्रकल्पाअंतर्गत कल्याणकारी शासकिय योजनांची माहिती, मार्गदर्शन व समन्वयाचे काम सहभागी विद्यार्थीनींनी केले. लाभार्थ्यांची माहीती तसेच प्रकल्पाची अमलबजावणी करणा–या स्थानीक स्वराज्य संस्था, कार्यालयाशी संवाद व समन्वय साधून हा प्रकल्प विद्यार्थीनींनी पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. यात महाविद्यालयीन विद्याथीनींनी शासणाच्या कल्यानकारी विकास योजनांची माहीती करुन ग्रामीन भागातील व्यक्तींचे व्यक्ती–अध्ययन अहवाल तयार केलेले आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थीनींना शासनाच्या विविध कल्याणकारी विकास योजनांची माहिती मिळून कल्याणकारी योजनांच्या कार्यान्वयाचा तुलनात्मक अभ्यास करुन विद्यार्थीनींत संशोधन

कार्य करण्यास चालना मिळालेली असून महाविद्यालयीन विद्यार्थीनींची राज्याच्या विकास प्रक्रियेत सहभागिता वाढण्यास मदत झालेली दिसून येते.

जनतेच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक विकासासाठी राज्ये विविध कल्याणकारी योजणा राबवित असून समाजातील काही लक्ष्य गट डोळयासमोर ठेउन त्यांच्या जिवणात परिवर्तन घडवून त्यांना सुखी व सम्रृध्द करण्यासाठी विविध कल्याणकारी योजना शासन आपल्या विकास यंत्रनांमार्फत कार्यान्वीत करीत आहे. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, अल्पसंख्यांक, इतर मागासवर्गिय, ज्येष्ट नागरिक, भटक्या व विमुक्त जाती, दारिद्रय रेषेखालील कुटूंब, मजुर, अपंग, महिला, कामगार, शेतमजुर, सुशिक्षित बेरोजगार, युवक आणि क्रिडा, बालक, अपघातग्रस्त, निराधार, आपत्तीग्रस्त, किशोरवयीन, प्रौढ नागरिक, अत्याचारग्रस्त अनाथ, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, कलाकार ग्रामीन वन मजुर, मच्छीमार, बेघर, अकुशल कामगार, शेतकरी, विद्यार्थी, अनाथ बालके यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून आजिवन व विस्तार विभागाच्या वतीने सक्षम व सहयोग प्रकल्पाअंतर्गत स्वयंउद्योजकता मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, या कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यकारी प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे होत्या तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते महाराष्ट्र शासनाचे भंडारा जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी मा. विवेक तोंडरे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने अर्थसहाय कशारितीने व आपण कोणत्या प्रकारचें उद्योग तयार केले पाहीजे त्यातून स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले.

तसेच जॉब रेडीनेसवर महाविद्यालयात कार्यशाळा आयोजि करण्यात आली होती. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यकारी प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे होत्या, यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणातून तांत्रिक शिक्षणाच्या माध्यमातून कौशल्य विकास करण्यासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत त्यामूळे इ—लर्निंग यावर भर देण्यात यावा असे मत व्यक्त केले. तसेच मुख्य मार्गदर्शक म्हणून मा. रोहित सोनी (एम.के.सी.एल., एल.एल.सी., समन्वयक, भंडारा), मां. संजय डोहडे (एम.के.सी.एल. माकेटींग इंटर्न, भंडारा), व मा. तेजलाल गौतम (गौतम कॉम्प्युटर एज्युकेशन, भंडारा) यांनी जॉबरेडीनेस म्हणजेच

डिजीटल युगात घरी बसून कशी ऑनलाईन कामे करता येतील व तसेच फ्रिलांसिंग मार्फत काम करुन रोजगार प्राप्त करुन पैसे कमाविता येतील या विषयावर मार्गदर्शन केले व सायबर सेक्युरिटी या विषयावर सुध्दा मार्गदर्शन केले.

**SMT. REWABEN MANOHARBHAI PATEL**
**MAHILA KALA MAHAVIDYALAYA, BHANDARA**
Behind B.D.C.C. Bank, Civil Line, Bhandara - 441 904. (M.S.)
Ph.: 07184-253861, 250898, Email : rmpcollege@rediffmail.com

RMPC/ 127/ 2018-19 19-20

Date : 11/09/2019

प्रति,

मा. संचालक,

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग,

रा.तु.म.नागपूर विद्यापीठ नागपूर,.

विषय :— प्रकल्पात प्रवेशित विद्यार्थीनी यादी व प्रवेश फि बाबद.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाच्या वतीने उन्नती व संस्कार प्रकल्प उपक्रमात सत्र २०१९—२०मध्ये एकुण ३० विद्यार्थीनींचा समवेश करण्यात आला. त्यांचे नामांकण शुल्क ९००/— (नऊशे रूपये) डी. डी. नं. ७६८५२६ व्दारे जमा करीत आहोत.

सदर प्रकल्पास आपली मंजूरी देण्यात यावी. धन्यवाद!

सहपत्रे

१. धनादेश
२. ~~प्रस्ताव~~ प्रस्ताव
३. विद्यार्थीनीची यादी

12-9-19.

Officiating Principal
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya,
Bhandara.

**SMT. REWABEN MANOHARBHAI PATEL**
**MAHILA KALA MAHAVIDYALAYA, BHANDARA**
Behind B.D.C.C. Bank, Civil Line, Bhandara - 441 904. (M.S.)
Ph.: 07184-253861, 250898, Email : rmpcollege@rediffmail.com

RPC/ 127/ 2019-20

Date : 11/09/2019

## उन्नती व संस्कार प्रकल्प उपक्रमात

विद्यार्थीनींची यादी B.A. I SEM

| अं. क्र. | विद्यार्थीनीची नांवे | अं. क्र. | विद्यार्थीनीची नांवे |
|---|---|---|---|
| ०१ | कु. लतेश्वरी के. देवतारे | १६ | भवनी जी. दुधांगे |
| ०२ | तेजश्विनी एन. समरीत | १७ | भुमेश्वरी टी. मडावी |
| ०३ | मयुरी ए. सार्वे | १८ | चांदणी एम. दमाहे |
| ०४ | शितल बि. भोयर | १९ | दिक्षा जी रामटेके |
| ०५ | मयुरी बि. अतकरी | २० | दुर्गा एफ. शनवारे |
| ०६ | कांचन एस. काळे | २१ | गिता डी. जुगनायके |
| ०७ | वैष्णवी गरपडे | २२ | अंजली डी. धवाले |
| ०८ | शिल्प पि. जगणाडे | २३ | पायल एस. चंद्रिकापुरे |
| ०९ | शिवाणी आर. गुरव | २४ | समिक्षा व्हि. मेश्राम |
| १० | राणी एल. धकाते | २५ | नुपूर के. गोस्वामी |
| ११ | स्वार्थी एम. बडवाईक | २६ | वेष्णवी सोनटक्के |
| १२ | आचल के. फुलेकर | २७ | श्रुतीका डी. खेब्रागडे |
| १३ | अर्चना जी. सलामे | २८ | निकीता पी. कोलवते |
| १४ | भाग्यश्री यु. उके | २९ | स्वाती यु. पडोळे |
| १५ | भारती वाय. मते | ३० | प्रणाली जी. खोब्रागडे |

Officiating Principal
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya,
Bhandara.

# आर.एम.पटेल महाविद्यालयात उद्योजकता मार्गदर्शन



**भंडारा ■ प्रतिनिधी**

भंडारा, गोंदिया शिक्षण संस्था व्दारा संचालीत रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे महाराष्ट्र शासनाने भंडारा जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी विवेक तोंडरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थीनींकरीता आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या विभागामार्फत स्वयःम उद्योजकता मार्गदर्शन दिनांक ७ फेब्रुवारीला आयोजित केले होते.

यात शासनाच्या वतीने अर्थसहाय्य कशारीतीने व आपण कोणत्या प्रकारचे उद्योग तयार केले पाहिजे.त्यातुन स्वयःम रोजगार निर्माण करण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य रंजना शृंगारपुरे यांनी शासनाच्या वतीने आयोजित शिबीरात आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थीनी सहभागी होतील असे आश्वासन दिले.या कार्यक्रमात प्रा.नरेश बोरकर, समन्वयक,आजीवन अध्ययन व विस्तार विभाग,रे.अ.पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा प्रा. ज्ञनेश घरडे व बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा.डॉ.शिरिष नखाते यांनी केले.

# जॉब रेडीनेसवर आर.एम.पटेल महाविद्यालयात कार्यशाळा



**प्रतिनिधी**

**भंडारा** : गोंदिया शिक्षण संस्थाद्वारा संचालीत श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने सक्षम व सहयोग प्रकल्पांतर्गत जॉब रेडीनेस, डिजीटक फ्रिलान्सिंग व सायबर स्नियोरिटीवर दि. १५ फेब्रुवारी रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक गौतंम, संजय डोहडे, एमकेसीएल मार्केटीग इंटर्न भंडारा व गौतंम कॅम्पुटर एज्युकेशन भंडारा यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहणे खूपच कठीन आहे. पाहिजे. या विषयांशी संबंधित जॉब रेडीनेस म्हणजे डिजीटल युगात घरी असून कशी ऑनलाईन कामे करता येतील. तसेच फ्रिलांसिन्ग मार्फत काम करून रोजगार प्राप्त करून पैसे कमविता येतील. या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या युगात इंटनेटचा वापर खुपच वाढलेला आहे. तसेच सायबर गुन्हे वाढत चालले आहेत. त्यामुळे मुलींनी या सायबर गुन्हयांत बळी पडू नयेत म्हणून सायबर स्रियुरीटी या विषयावर सुद्धा मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य रंजना श्रृंगारपूरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून तांत्रीक शिक्षणाच्या माध्यमातून कौशल्य विकास करण्यासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे ई-लर्निंगवर भर देण्यात यावा, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. चंद्रशेखर शमी यांनी केले तर आभार प्रा.नंदेश बोरकर यांनी मानले. कार्यक्रमात प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनी प्रामुख्याने उपस्थित होती.